महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे,
कस्तुरी इमारत, तळ मजला,
पेट्रोलियम हाऊस समोर, ज.द.मार्ग, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.

दूरध्वनी क्रमांक:०२२- २२८८०१०६/१७ ईमेल : ao.transfer२०२४@mahakosh.in संकेतस्थळ:www.mahakosh.gov.in

वाचा :- १.शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.१/९५/बारा, दि.०८.०६.१९९५
२.शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-१०९६/प्र.क्र.३३/९५/बारा, दि.२०.०३.१९९७
३.शासन निर्णय वित्त विभाग क्र.११९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३,दि.२०.०७.२००१
४.शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र.वेतन-२००२/प्र.क्र.१/सेवा-३,दि.११.०१.२००२
५.संचालनालयाचे आदेश क्र.संलेको/कोवि/आस्था/टिस-२/७३९ दि.२४.०२.२००९
६.शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र.वेतन ११०९/प्र.क्र.४३/सेवा-३,दि.३१.०८.२००९
७.शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र.वेतन ११०९/प्र.क्र.४४/९९/सेवा-३,दि.०१.०४.२०१०
८.शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र.वेतन ११११/प्र.क्र.८/सेवा-३,दि.०१.०७.२०११
९.शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र.आप्रयो-१०१२/प्र.क्र.७१/सेवा-३,दि.१९.०१.२०१३
१०.शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्र.वेतन-११११/प्र.क्र.८/सेवा-३,दि.०९.१२.२०१६
११.शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्र.आप्रयो-१०१५/प्र.क्र.१११/२०१५/सेवा-३ दि.२३.१२.२०१५
१२.शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्र.वेतन-११११/प्र.क्र.०८/सेवा-३ दि.११.०५.२०१७
१३.शासन निर्णय,वित्त विभाग,क्र.वेतन-१११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा-३ दि.०२.०३.२०१९
१४.शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन-१२, दि.०१.०८.२०१९

---

क्र.संलेको २०२६/प्रशा-राप/सुसेआप्रयो/जोगळे/ 563 दिनांक :- 24 APR 2026

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहायक संचालक संवर्गातील श्री.पांडुरंग विश्राम जोगळे, सेवानिवृत्त सहायक संचालक यांचा सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत लाभ अनुज्ञेय करणेबाबतचा अर्ज संचालनालयास प्राप्त झाला आहे.

तद्नुषंगाने पडताळणी केली असता पुढीलप्रमाणे आढळून आले:-

श्री.जोगळे यांची दि.१८.०७.१९७० रोजी सहाय्यक बंदर पर्यवेक्षक संवर्गात प्रथम नियुक्ती झाली. तद्नंतर त्यांची दि.०१.०३.१९७९ रोजी वरिष्ठ लेखापरीक्षक (गट-क) संवर्गात निवडीने नियुक्ती झाली असून त्यांना दि.०१.०१.१९९५ रोजी लेखा अधिकारी संवर्गात व दि.११.०५.२००९ रोजी सहायक संचालक संवर्गात पदोन्नती देण्यात आली आहे. श्री.जोगळे दि.३१.०५.२००९ रोजी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत.

श्री.जोगळे यांना उपरोक्त संदर्भ क्र.५ च्या आदेशान्वये तत्कालीन शासन निर्णयान्वये लेखा अधिकारी पदोन्नती दि.०१.०१.१९९५ पासून १२ वर्षांच्या नियमित सेवेनंतर दि.०१.०१.२००७ रोजी सहायक संचालक संवर्गाच्या वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ अनुज्ञेय करण्यात आला आहे.

वास्तविक श्री.जोगळे यांची वरिष्ठ लेखापरीक्षक (गट-क) नियुक्ती दि.०१.०३.१९७९ पासून १२ वर्षांची नियमित सेवा दि.०१.०३.१९९१ रोजी पूर्ण होते. मात्र तत्कालीन शासन निर्णय दि.०८.०६.१९९५ अन्वये १२ वर्षांची नियमित सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना कालबद्ध पदोन्नतीचा लाभ दि.०१.१०.१९९४ पासून अनुज्ञेय करण्यात आला आहे.

उपरोक्त तरतुदीनुसार व सा.प्र.वि.शा.नि.दि.२०.०३.१९९७ मधील स्पष्टिकरणात्मक तक्ता मुद्दा क्र.१ अन्वये श्री.जोगळे यांना वरिष्ठ लेखापरीक्षक (गट-क) पदोन्नती दि.०१.०३.१९७९ पासून १२ वर्षांच्या नियमित सेवेनंतर दि.०१.१०.१९९४ रोजी लेखा अधिकारी संवर्गाच्या वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ अनुज्ञेय ठरत आहे. श्री.जोगळे यांना लेखा अधिकारी संवर्गात दि.०१.०१.१९९५ रोजी कार्यात्मक पदोन्नती देण्यात आली आहे. तसेच वित्त विभाग शासन निर्णय दि.०१.०४.२०१० मधील तरतूदीन्वये पहिल्या लाभाच्या दि.०१.१०.१९९४ पासून १२ वर्षांच्या नियमित सेवेनंतर दि.०१.१०.२००६ रोजी सहायक संचालक संवर्गाच्या वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ अनुज्ञेय ठरत आहे.

त्यानुसार श्री.जोगळे यांना लेखा अधिकारी संवर्गाचा पहिला लाभ अनुज्ञेय करणे व सहायक संचालक संवर्गाच्या वरिष्ठ वेतनश्रेणीचा दि.०१.०१.२००७ पासून देण्यात आलेला लाभ सुधारीत करणे आवश्यक ठरते.

उपरोक्त वस्तुस्थितीच्या आधारे पुढीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

आदेश :-

उपरोक्त संदर्भ क्र.१ वरील सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०८.०६.१९९५ च्या शासन निर्णयान्वये राज्य शासकीय कर्मचा-यांना संबंधित पदावरील १२ वर्षाच्या नियमित सेवेनंतर लागू करण्यात आलेली सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना सुधारीत स्वरुपात उपरोक्त संदर्भ क्र.७ वरील दि.०१.०४.२०१० च्या शासन निर्णयान्वये दि.०१.१०.२००६ पासून अंमलात आली आहे.

सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार शासकीय कर्मचारी / अधिकाऱ्यांना १०,२० व ३० वर्षांच्या नियमित सेवेनंतरची तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना वित्त विभागाच्या दि.०२.०३.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये दि.०१.०१.२०१६ पासून अनुज्ञेय करण्यात आली आहे.

सदर शासन निर्णयामधील नमूद तरतूदीनुसार, सातव्या वेतन आयोगामध्ये तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना, वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर एस-२० पर्यंत वेतन घेणाऱ्या (सहाव्या वेतन आयोगातील पे बँड रु.१५६००-३९१०० व ग्रेड पे रु.५४००/- या सुधारीवेतन संरचनेशी समकक्ष) कर्मचारी /अधिकाऱ्यांना लागू राहील. संबंधित कर्मचारी/अधिकारी हे कोणत्याही कारणामुळे वेतनस्तर एस-२१ मध्ये वेतन आहरीत करु लागतील, तेव्हा त्यांना उपरोक्त नवीन योजनेंतर्गत लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

यास्तव महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहायक संचालक संवर्गातील श्री.पांडुरंग विश्राम जोगळे यांना त्यांच्या महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वरिष्ठ लेखापरिक्षक संवर्गातील १२ वर्षाच्या नियमित सेवेनंतर त्यांच्या पदोन्नती साखळीतील लेखा अधिकारी संवर्गाच्या वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ हा शासकीय सेवेतील पहिला लाभ म्हणून पुढील तक्त्यात त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र.५ मध्ये नमूद दिनांकापासून अनुज्ञेय करण्यात येत आहे.

तसेच श्री.जोगळे यांना यापूर्वीच्या आदेशान्वये लेखा अधिकारी संवर्गातील १२ वर्षांच्या नियमित सेवेनंतर दि.०१-०१-२००७ पासून अनुज्ञेय करण्यात आलेला सहायक संचालक संवर्गाच्या वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ या आदेशान्वये रद्द करुन पुढील तक्त्यात त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र.६ मध्ये नमूद दिनांकापासून सुधारीत करण्यात येत आहे.

| अधिकाऱ्याचे नांव | शासन सेवेतील नियुक्ती दिनांक | सहायक लेखा अधिकारी संवर्गात निवडीने नियुक्ती दिनांक | लेखा अधिकारी संवर्गात पदोन्नती दिनांक | सा.प्र.वि.शा.नि. दि.०८.०६.१९९५ नुसार कालबद्ध पदोन्नतीचा लाभ अनुज्ञेय होण्याचा दिनांक | सा.प्र.वि.शा.नि.दि.२०.०३.१९९७, वि.वि.शा.नि. दि.२०.०७.२००१ व दि.०१.०४.२०१० नुसार सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय होण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| श्री.पांडुरंग विश्राम जोगळे से. नि.दि.३१-०५-२००९ | १८-०७-१९७० सहायक बंदर पर्यवेक्षक | ०१-०३-१९७९ वरिष्ठ लेखा परिक्षक (गट-क) | ०१-०१-१९९५ | ०१-१०-१९९४ लेखा अधिकारी संवर्गाच्या वरिष्ठ वेतनश्रेणीचा पहिला लाभ | ०१-१०-२००६ सहायक संचालक संवर्गाच्या वरिष्ठ वेतनश्रेणीचा दुसरा लाभ सुधारीत |

अटी व शर्ती :

१. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दि.०८.०६.१९९५ मधील अट क्र.२ (मा) : या योजनेंतर्गत अनुज्ञेय करण्यात आलेल्या लाभामुळे संबंधित अधिकाऱ्यांच्या जबाबदारी व कर्तव्यांमध्ये वाढ होत नसली तरी नियमित पदोन्नतीप्रमाणे पदोन्नतीच्या पदाच्या वेतन संरचनेत वेतन निश्चितीचा लाभ मिळेल. या योजनेतंर्गत वरिष्ठ वेतन संरचना दिल्यानंतर वेतन निश्चिती नियमित पदोन्नतीप्रमाणे होईल मात्र त्याच वेतन संरचनेत नियमित/ कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यानंतर पुन्हा वेतन निश्चितीचा लाभ देय होणार नाही.

२. या आदेशान्वये सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यांत आलेल्या अधिकाऱ्यांनी शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक.पीएवाय-१०८२/सीआर/११००/(एक)/एसईआर-३, दिनांक ०६.११.१९८४ व वित्त विभाग, शासन परिपत्रक वेपूर-२०१९/प्र.क्र.८/सेवा-९ दि.२०.०२.२०१९ नुसार वेतननिश्चितीचा विकल्प द्यावयचा असल्यास तो त्यांनी हे आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत संबंधित कार्यालय प्रमुखांकडे सादर करावा.

३. संबंधित कार्यालय प्रमुखांनी वरील अधिकाऱ्यांची पदोन्नतीच्या पदाच्या वेतन संरचनेतील वेतननिश्चिती त्यांनी दिलेल्या विकल्पानुसार करून त्यांना या योजनेचा लाभ त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून एस-२० वेतनस्तरामध्ये देण्यांत यावा.

४. उपरोक्त नमूद सेवानिवृत्त सहायक संचालक हे नियमित निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतन घेत असल्याची खात्री करूनच वेतननिश्चिती व थकबाकी संदर्भात पुढील कार्यवाही करण्यात यावी.

५. सदरचे आदेश संचालनालयाच्या https: mahakosh.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असल्यामुळे सदर आदेशाच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांच्या वेतननिश्चितीसाठी कार्यालय प्रमुख यांनी संकेतस्थळावरील प्रत ग्राहय धरावी.

(दीपा देशपांडे)
संचालक
लेखा व कोषागरे.
महाराष्ट्र राज्य. मुंबई.

प्रत :.
१. सहसचिव,वित्त विभाग,मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ०३२
२. महासमादेशकांचे कार्यालय, होमगार्ड मुख्यालय-४०००३२
३. संबंधित कोषागार कार्यालय
४. संबधित अधिकारी यांना त्यांचे कार्यालय प्रमुखांमार्फत.
५ . संबधित अधिकारी यांची वैयक्तिक नस्ती.
६. निवड नस्ती.